MHYA200004702019

**दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) , मारेगांव, जि. यवतमाळ.**
**(पीठासीन अधिकारी निलेश प्रभाकर वासाडे)**

नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३५/२०१९ मध्ये

अनिता वि. लहानुबाई + ०४.

## निशाणी क्र.५ वरील आदेश

सदर अर्ज वादीने आदेश ३९, नियम १ व २ सह कलम १५१ दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अंतर्गत तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश मिळावा यासाठी दाखल केला आहे.

२. सदरचा अर्ज वादीने गट न.३०, क्षेत्रफळ ४ हे २१ आर, मौजा मेंढणी, गट न. ८८/२, गांव न. ३८७, क्षेत्रफळ १ हे ६४ आर, मौजा हटवांजरी, गट न. ८९, गांव न. ३८७, १ हे ६२ आर, मौजा हटवांजरी, ता. मारेगांव, जि. यवतमाळ (यानंतर त्याला ''वादमालमत्ता'' असे समजण्यात येईल) ही मालमत्ता प्रतिवादींनी दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणालाही विकु नये किंवा त्यांच्यामार्फत इतर कोणत्याही त्रयस्थ व्क्तीचा हित निर्माण् करुन नये अशा आशयाचा तात्पुरता मनाई हुकूमाच्या आदेशासाठी दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ही अर्जदाराची आई असुन प्रतिवादी क्र. २ ते ५ हे तिचे सख्ये भाउ–बहीन आहे. अर्जातील वाद मालमत्ता ही वादी व प्रतिवादी क्र. ५ चे वडील म्हणजेस प्रतिवादी क्र. १ चे पती विनायक गणपत वासाडे, यांना त्यांचे वडील त्यांच्या मृत्युनंतर भावातील वाटनीत हिस्सात मिळाली. म्हणुन सदर मालमत्ता ही वडीलोपार्जीत आहे. वादीचे वडील हे दिनांक १९/१०/२००१ रोजी मरण पावले. त्यामुळे वादी व प्रतिवादी हे शेतीचे मालक आहे. परंतु वादीच्या गैरहजेरीत प्रतिवादी क्र. १ व २ नी महसुल अधिका–याशी हातमिळवणी करुन गट नं. ३०, ४ हे २१ आर, मौजा मेंढणी, व शेत गट नं. ८८/२, क्षेत्रफळ १ हे ६४ आर, मौजा हटवांजरी, ही प्रतिवादी क्र. १ व २ यांनी स्वतःच्या नावाने नोंद करुन घेतली. वादीला सदर माहिती दिनांक २५/०५/२०१९ रोजी सेतु केंद्रातुन माहिती काढल्यानंतर माहिती पडले की, गट न. ३० वर प्रतिवादी क्र. १ व २ व गट न. ८८/२ वर प्रतिवादी क्र. २ चे नांव चढले आहे. त्यामुळे वादीने जुन २०१९ मध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांना प्रत्यक्ष भेटुन दाव्यातील शेत जमीनीची वाटणी करुन तिचा हिस्सा वेगळा करुन दयावा अशी मागणी केली. परंतु प्रतिवादींनी सदर मांगणी नाकारली. तरी सदर दस्ताच्या आधारे प्रतिवादी हे अर्जातील शेत जमीन तिस–या पक्षाच्या हक्कात हित संबधं निर्माण करुन अर्जातील शेत जमिनीचे हस्तांतरण करण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाव्दारे वादमालमत्ता दाव्याचा निकाल लागेपर्यत कुणालाही हस्तांतरण करु नये अशी मागणी केली. वादीचा वादमालमत्तेवर हिस्सा असून प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजुने आहे व सोईचे पारडेदेखील त्यांच्या बाजुने आहे. तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश न दिल्यास प्रतिवादी क्र.१ व २ हे कोण्या त्रयस्थ व्यक्तीला वादमालमत्ता विकेल व त्यामुळे वादींचे न भरुन निघणारे नुकसान होईल.

४. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र. ३२ वर उत्तर दाखल केले. त्यांच्या म्हणण्यानुसार गट न. ३०, क्षेत्रफळ ४ हे २१ आर व गट न. ८८, क्षेत्रफळ ३ हे २८ आर, ही जमीन प्रतिवादी क्रे. १ चे पती यांनी त्यांच्या स्वकष्टातुन विकत घेतली. तिचे पती जिवंत असतांना सन १९९४ रोजी गट न. ८८ मध्ये उत्तर दक्षिण धुरा पाडुन पुर्वेकडील १ हे ६४ आर जमीन प्रतिवादी क्र. २ याच्या वाटणीत व ताब्यात दिली. तसेच पश्चिमेकडील १ हे २४ आर ही जमीन तिच्या पतीने स्वतःच्या नांवावर ठेवली. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ च्या हिस्सातील जमीनीची नोंद गट न. ८८/२ अशी नोंदविण्यात आली. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ हा त्या जमीनीचा मालक व ताबेदार आहे. त्यानंतर गट नं. ८८/१ मध्ये तिचे पती मृत्यु पावल्यानंतर वादी व प्रतिवादी वारस हक्काने मालक ताबेदार झाले. त्यानंतर ही जमीन विकुन वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना मोबदला स्विकारुन प्रतिवादी क्र. १ व २ च्या हक्कात गट नं. ३० मधील त्याचा हक्क आपसी तोंडी व्दारे सोडुन देण्याचे ठरले. त्यानुसार दिनांक १२/०३/२००८ ला सदर लेखी लिहीला. त्यानुसार वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना गट क्र. ३० मधुन कोणताही हिस्सा मागणाच्या अधिकार नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी प्रार्थना प्रतिवादी क्र. १ व २ ने केली.

५. प्रतिवादी क्र. ३ ते ५ नी पुरसिस नि.क्र.३३ व्दारे त्यांना दाखल केलेला लेखी जबाब नि.क्र.३० या अर्जाचे उत्तर समजावे असे म्हटले. त्यांनी सुध्दा प्रतिवादी क्र. १ व २ ची मागणी मान्य केली. फक्त त्यांना शेत गट क्र. ८९ मध्ये हिस्सा वाटणी मागीतली.

६. वादींतर्फे श्री. आर. एस. हैदरी, अधिवक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. क्र.१ ते ५ यांचे वकीलांचा पुकारा केला असता गैरहजर.

७. वादी व प्रतिवादींचे कथनांचा विचार करता या अर्जाचे निवाडयाकरीता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींची सकृतदर्शनी केस आहे का ? | होय. |
| २. | वादींच्या बाजुने अनुकुलता समतोल आहे का ? | होय. |
| ३. | अपरिमित नुकसान कोणाचे होणार आहे ? | वादीचे. |
| ४. | काय आदेश | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

८. वादींनी आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ वादमालत्तेचे सातबारा उतारे, फेरफार पत्रक दाखल केले आहे.

**मुद्दा क्र. १ ते ३ करीताः**

०९. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी सुसंगत व संलग्न असल्याने कथनाची पुनरावृत्ती होवु नये म्हणुन एकत्रीत चर्चेस घेतले आहेत. वादींनी अर्जात असे नमुद केले आहे की, वादमालमत्ता ही वादीचे वडील विनायक वासाडे यांची असून वादी व प्रतिवादी त्यांचे वारस आहेत. प्रतिवादी क्र. १ व २ नी शेत गट नं. ८८/२ मध्ये आपले नांव चढवले तसेच प्रतिवादी क्र. १ नी शेत गट नं. ३० मध्ये आपले नांव चढवले. प्रतिवादींच्या मते त्यांना शेत गट नं. ८८/१ विकुन आलेला मोबदला अर्जदार व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना दिला. त्यामुळे गट क्र. ३० मध्ये सर्वानी प्रतिवादी क्र. १ ला

हक्क सोड लिहुन दिला. तसेच गट नं. ८८/२ ही वादीच्या वडीलांनी प्रतिवादी क्र. १ व २ ला वाटणी व्दारे दिली.

१०. वाद मालमत्ता ही वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ च्या वडीलांची सर्वांना मान्य आहे. त्यामुळे त्यांच्या मृत्यु नंतर सदर वाद मालमत्ता वारसा हक्काने सर्वांना मिळण्यासाठी पात्र आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अभिलेखावर हक्क सोड लेख व त्यांना करुन दिलेले वाटणीपत्र दाखल केले नाही. जर हक्क सोड लेख नोंदणीकृत नसल्यास त्याला महत्व नसते. तसेच शेत गट नं. ८८/१ विकुन त्याचा मोहबदला प्रतिवादी क्र.३ ते ५ व वादी यांना मिळाला व त्याबदल्यात त्यांनी हक्क सोड लिहून दिला हे सुध्दा प्रथम दर्शनीय सिध्द झाले नाही. वाद मालमत्ता ही वडीलोपार्जीत असल्याची सर्वांना मान्य आहे. तसेच सोयीची पारडे सुध्दा त्यांच्या बाजुन आहे. जर प्रतिवादी क्र. १ व २ नी वादमालमत्ता विकली तर वादींचे न भरुन निघणारे नुकसान होईल व दाव्यात अजुन पक्ष जोडल्या जाईल. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर त्या अनुषंगाने देत असून मुद्दा क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना याद्वारे आदेश देण्यात येते की त्यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणालाही वादमालमत्ता विकु नये किंवा त्यांच्यामार्फत इतर कोण्या त्रयस्थ व्यक्तीचे त्यात हित निर्माण करु नये.

Digitally signed by NILESH PRABHAKAR WASADE
Date: 2022.02.14 17:39:30 +0530

स्थळः मारेगांव
दिनांकः १४/०२/२०२२.

(निलेश प्रभाकर वासाडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर.,
मारेगांव.